# Kesri

## MIT-LRA to inaugurate City Beautification Through Lighting

**Date: 19-02-2008 | Edition: Pune | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 14 H: 11**




# ‘वीजबचती’साठी सौरऊर्जेचा वापर आवश्यक

पुणे : शहरातील रस्त्यावरील दिव्यांची निगा राखली जावी, तसेच विजेची बचत व्हावी यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत, असे मत ऑस्ट्रेलियातील युनिव्हर्सिटी ऑफ सिडनीचे संचालक आणि आर्किटेक्चरल अँड डिझाईन पॅसिफिकचे सौरऊर्जा विषयाचे प्राध्यापक डॉ. वॅरेल ज्युलियन यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

माईर्स एमआयटी एम आरएच्या वतीने शहरातील सौंदर्यात भर घालण्यासाठी सौरऊर्जेचा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ज्युलियन म्हणाले, सौरऊर्जेच्या सहाय्याने विजेची भरपूर बचत होते. प्रत्येक शहराकडे विकासाचा ‘मास्टर प्लॅन’ असतो. एक आव्हान समजून सौरऊर्जेकडे पाहिले पाहिजे.

इंटरनॅशनल डार्कस्काय असोसिएशनचे प्रमुख रेग विल्सन म्हणाले, तंत्रज्ञान खूप विकसित झाले आहे. त्यांचा अवलंब केला पाहिजे. सौरऊर्जेचा वापर व विजेची बचत करण्यासाठी पाश्चिमात्य देशांत जनजागृती करण्यात येत आहे. सौरऊर्जेमुळे प्रदूषण टाळण्यास मदत होते.एमआयटीचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील कराड म्हणाले, शहराच्या सौंदर्यासाठी आम्ही हा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी एमआयटी लायटिंग रिसर्च ॲकॅडमीतर्फे अभ्यासक्रम तयार करण्यात आला. वीजबचतीसाठी अधिक आर्थिक बचत करणारे व पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे यावर या अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. यावेळी इंडियन सोसायटी ऑफ लायटिंग इंजिनिअर्सचे अध्यक्ष डॉ. अविनाश कुलकर्णी, सी अँड आय बिझिनेसचे मुख्य कार्यकरी अधिकारी राजेश कोच्चर उपस्थित होते.

# राष्ट्रीय हरित सेनेतर्फे ‘खेलो होळी’ उपक्रम

पुणे : होळीच्या सणात होणारी वृक्षतोड आणि रासायनिक रंगांची उधळण थांबविण्यासाठी तसेच होळी पर्यावरण सुसंगत पद्धतीने साजरा करण्यासाठी ‘खेलो होळी, इको फ्रेंडली’ हा उपक्रम सामाजिक वनीकरण संचालनालयाच्या वतीने महाराष्ट्रभर राबविला जाणार आहे. दरवर्षी राज्यात होळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. परंतु याचवेळी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होते. वणवे पेटवून प्राण्यांची शिकार होते. हे थांबविण्यासाठी हा उपक्रम राष्ट्रीय हरित सेनेमार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती संचालक, प्रकाश ठोसरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.